# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/मनपा-२०२०/प्र.क्र.७/का.५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २९ जानेवारी, २०२०

प्रति,
आयुक्त,
औरंगाबाद, नवी मुंबई, वसई-विरार,
कल्याण-डोंबिवली व कोल्हापूर महानगरपालिका.

विषय :- ५ महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२०

संदर्भ :- राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दि. ३ व १४ जानेवारी, २०२० चे आदेश.

महोदय,

उपरोक्त विषयावरील संदर्भाधीन आदेशान्वये एकसदस्यीय पध्दतीनुसार महानगरपालिकांमध्ये प्रभाग रचना व आरक्षण निश्चित कशाप्रकारे करण्यात येईल याबाबतचे आदेश काढण्यात आले आहेत. या महानगरपालिकांमध्ये आरक्षण चक्रानुक्रमे फिरविण्याची कार्यवाही करताना बऱ्याच शक्यता निर्माण होतात. या सर्व शक्यतांचा विचार आदेशामध्ये नमूद करण्यात आलेला नाही. तथापि, आरक्षण चक्रानुक्रमे फिरवताना ते कोणत्या तत्वानुसार फिरविणे आवश्यक आहे याबाबत खालील उदाहरणाद्वारे स्पष्टीकरण देण्यात येत आहे :-

समजा, महानगरपालिकेची सन २००५, २०१०, २०१५ मध्ये एक सदस्यीय पध्दतीने निवडणूक झाली असून आता सन २०२० मध्ये एखादे आरक्षण चक्रानुक्रमे फिरविण्याची कार्यवाही करावयाची आहे. याबाबत मागील ३ निवडणुकांमध्ये झालेल्या आरक्षणाच्या शक्यता विचारात घेऊन खालील

प्राधान्यक्रमाने सन २०२० मध्ये आरक्षण देण्याची कार्यवाही करण्यात येईल :-

| अ. क्र. | सन २००५ चे आरक्षण | सन २०१० चे आरक्षण | सन २०१५ चे आरक्षण | सन २०२० च्या आरक्षणाकरिता विचारात घ्यावयाचा प्राधान्यक्रम |
|---|---|---|---|---|
| १ | - | - | - | प्राध्यान्यक्रम क्र. - १ |
| २ | आहे | - | - | प्राध्यान्यक्रम क्र. - २ |
| ३ | - | आहे | - | प्राध्यान्यक्रम क्र. - ३ |
| ४ | आहे | आहे | - | प्राध्यान्यक्रम क्र. - ४ |
| ५ | - | - | आहे | प्राध्यान्यक्रम क्र. - ५ |
| ६ | आहे | - | आहे | प्राध्यान्यक्रम क्र. - ६ |
| ७ | - | आहे | आहे | प्राध्यान्यक्रम क्र. - ७ |
| ८ | आहे | आहे | आहे | प्राध्यान्यक्रम क्र. - ८ |

२. एखाद्या पदाचे आरक्षण निश्चित करताना वरीलपैकी यथास्थिती कमीत कमी १ ते जास्तीत जास्त ७ शक्यता उद्भवू शकतात. त्या शक्यतांपैकी उद्भवणाऱ्या शक्यतांचा विचार करुन त्यानुसार प्राधान्यक्रम ठरविण्यात यावा. म्हणजे जर एखादे आरक्षण निश्चित करताना त्यामध्ये वरीलपैकी अ.क्र. १, ३ व ५ येथील शक्यता उद्भवत असतील तर अ.क्र. १ चा विचार प्रथम प्राधान्याने होईल, त्यानंतर अ.क्र. ३ चा विचार व शेवटी अ.क्र. ५ चा विचार होईल.

३. i) प्रथम अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता लोकसंख्येच्या टक्केवारीच्या उतरत्या क्रमाने मागील निवडणुकांमध्ये आरक्षित न झालेल्या प्रभागांचा विचार करण्यात येईल. असे करताना वरील उदाहरणात दर्शविल्यानुसार शक्यता उद्भवत असल्यास त्या प्राधान्यक्रमाने प्रभागांचा आरक्षणाकरिता विचार करण्यात येईल.

ii) त्यानंतर नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाचे आरक्षण निश्चित करताना देखील वरील उदाहरणात दर्शविल्यानुसार शक्यता उद्भवत असल्यास त्या प्राधान्यक्रमाने प्रभागांचा आरक्षणाकरिता विचार करण्यात येईल.

iii) महिलांचे आरक्षण (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील महिलांसह) निश्चित करताना देखील वरील उदाहरणात दर्शविल्यानुसार शक्यता उद्भवत असल्यास त्या प्राधान्यक्रमाने प्रभागांचा आरक्षणाकरिता विचार करण्यात येईल.

vi) वरील उदाहरणानुसार प्राधान्यक्रम विचारात घेताना ज्या प्रवर्गाचे आरक्षण चक्रानुक्रमे फिरविण्यात येत आहे, ते आरक्षण आहे / नाही ते विचारात घेण्यात येईल. मात्र महिलांच्या बाबतीत आरक्षण विचारात घेताना कोणत्याही प्रवर्गातील महिलांचे आरक्षण होते किंवा कसे ते विचारात घेण्यात यावे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र